# CENTRAL CABLES LTD.

**Date: 17.11.2025**

**The Secretary,**
**Metropolitan Stock Exchange of India Limited**
**Vibgyor Towers, 4th Floor, Plot No. C62, G Block**
**Opp-Trident Hotel, Bandra Kurla Complex, Bankdra (E)**
**Mumbai- 400 098**

**Ref: Symbol- CENTRAL**

**Dear Sir,**

**Reg: Newspaper Publication of Unaudited Financial Results for quarter ended 30th September, 2025**

Pursuant to Regulation 30 read with Part-A of Schedule-III of Securities & Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith scanned copies of the Unaudited Financial Results of the Company for the quarter ended on 30th September, 2025 as published in the newspapers viz. **"Indian Express" in English and "Lok Satta" in Local Newspapers on 15th November, 2025**.

The copies of the said publication are also available on the website of the Company at www.centralcables.in.

Please inform the same to all the concerned.

Thanking You,

Yours faithfully,

**For Central Cables Limited**

JAYA BAJPAI Digitally signed by JAYA BAJPAI Date: 2025.11.17 13:08:32 +05'30'

**Jaya Bajpai**
**Company Secretary**

**Encl: As stated**

**CIN: L31300MH1981PLC023772**
**Regd. Office: 5, Temple Road, Civil Lines, Nagpur - 440001 India**
**Corporate Office: 1, Shakespeare Sarani, 6th Floor Room No. 6C, A. C. Market Kolkata- 700071**
**Tel.: +91- 712 - 2523054, 2546468; Fax: +91 - 712 – 2536149;**
**Email: care.centralcables@gmail.com; Website: www.centralcables.in**

# सीताबर्डीतील फेरीवाल्यांवर कारवाई, अवमानना याचिका फेटाळली

## फेरीवाल्यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**नागपूर :** सीताबर्डी परिसरातील फेरीवाले हटवण्याच्या विरोधात दाखल केलेली अवमानना याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शुक्रवारी फेटाळली. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

उच्च न्यायालयाने २०२३ मध्ये दिलेल्या आदेशात स्पष्ट केले होते की, ज्यांना पूर्वी महापालिकेकडून फेरीवाला परवाना दिला होता, पण काही कारणांमुळे त्याचे नूतनीकरण झाले नाही, अशा फेरीवाल्यांवर कोणतीही कारवाई करता येणार नाही. मात्र प्रशासनाने कारवाई केली. सीताबर्डी मेन रोडवरून फेरीवाले हटवण्याच्या कारवाईला विरोध करत नागपूर फेरीवाला फुटपाथ दुकानदार संघटनेचे सरचिटणीस रज्जाक कुरैशी यांनी अवमानना याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्यांचा दावा होता की मार्च २०२३ च्या आदेशात केवळ विनापरवानाधारक फेरीवाल्यांवरच कारवाई करण्याचे निर्देश होते.

मात्र महापालिकेने परवाना असलेल्या फेरीवाल्यांनाही हटवले. तसेच, नगररचना समितीच्या (टिव्हीसी) बैठकीत फेरीवाल्यांचे मुद्दे आणि जनप्रतिनिधींची मते न मानत एकतर्फी हॉकर झोन रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी याचिकेत नमूद केले. सीताबर्डी मेन रोडवरील फेरीवाले मागील ३५ वर्षांपासून व्यवसाय करत असून महापालिकेने दिलेल्या नोंदणीची प्रत त्यांच्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले.

### नियमानुसारच कारवाई

प्रारंभीच्या सुनावणीत न्यायालयाने महापालिकेच्या चार अधिकाऱ्यांना अवमानना नोटीस जारी करून भूमिका स्पष्ट करण्यासाठी सांगितले होते. याचिकाकर्त्यांनी महापालिकेचीही कारवाई न्यायालयाच्या आदेशाचा भंग असल्याचे सांगितले. दुसरीकडे, महापालिकेने टीव्हीसीच्या निर्णयानुसारच कारवाई करण्यात आली असल्याचे स्पष्ट केले. दोन्ही पक्षांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ एम.जी. भांगडे आणि ॲड. आदर्श बाहेती यांनी तर महापालिकेच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ सुबोध धर्माधिकारी आणि ॲड. जेमिनी कासट यांनी कामकाज पाहिले.

# विधिमंडळ सचिवालयाचे २८ नोव्हेंबरपासून नागपुरात कामकाज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी नागपुरात विधानमंडळ सचिवालयाचे कामकाज येत्या २८ नोव्हेंबर पासून सुरू होत आहे. विधानभवन येथे महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशनासंदर्भातील व्यवस्थेचा आढावा विधानमंडळ सचिव डॉ. विलास आठवले व शिवदर्शन साठ्ये यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी घेण्यात आला.

हिवाळी अधिवेशनानिमित्त रविभवन, नागभवन, आमदार निवास आदी ठिकाणी पीठासीन अधिकारी तसेच इतर लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी निवास व्यवस्था करण्यात येते. ती लवकर पूर्ण करा, अशी सूचना करण्यात आली. मुख्य प्रतोद व प्रतोद यांना मंत्री व राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयासाठी जागा द्यावी, असे सांगण्यात आले.

मंत्रिमंडळातील सदस्यांसाठी विधानभवन परिसरात कार्यालयीन दालनांची अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे.

### महिला आमदारांसाठी पहिला, दुसरा माळा

आमदार निवास येथे महिला सदस्यांसाठी पहिल्या इमारतीमधील पहिला व दुसरा माळा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इतर इमारतींमध्ये स्वच्छता, पाणी, विद्युत आदी सुविधा खंडित होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी, अशी सूचना सचिव डॉ. विलास आठवले यांनी केली.

विद्युत, दूरध्वनी व्यवस्था तसेच अधिवेशन कालावधीत विधानसभा व विधान परिषद येथे करावयाच्या व्यवस्थेचा यावेळी आढावा घेण्यात आला. विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत निवास, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा, वाहन व्यवस्था आदीसंदर्भात प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या व्यवस्थेसंदर्भात माहिती दिली.

## DIAMANT INFRASTRUCTURE LIMITED

Plot No. 3, Hindustan Colony, Wardha Road, Nagpur - 440015.
Tel : 8007442211, CIN No.: L26994MH2003PLC143264
Email : diamant123@gmail.com, Website : www.diamantinfra.com

**EXTRACT OF FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED 30th SEPTEMBER, 2025**

(Rs. In Lacs)

| Sr. | Particulars | Quarter Ended | | | Half Year Ended | | Year Ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 30.09.2025 (Un Audited) | 30.06.2025 (Un Audited) | 30.09.2024 (Unaudited) | 30.09.2025 (Un Audited) | 30.09.2024 (Un Audited) | 31.03.2025 (Audited) |
| 1. | Total Income from Operations | 3.77 | 3.77 | 3.767 | 7.535 | 7.535 | 18.306 |
| 2. | Net Profit/(Loss) for the period (Before Tax, Exceptional and/or Extraordinary Items) | 2.78 | ( 1.91) | 2.83 | 0.87 | 4.86 | 9.13 |
| 3. | Net Profit/(Loss) for the period Before Tax (After Exceptional and/or Extraordinary Items) | 2.78 | (1.91) | 2.83 | 0.87 | 4.86 | 9.09 |
| 4. | Net Profit/(Loss) for the period after tax (after extraordinary or exceptional items) | 2.78 | (1.91) | 2.83 | 0.87 | 4.86 | 9.09 |
| 5. | Paid Up Equity Share Capital (Face Value Rs.2/- Per Equity Share) | 704.08 | 704.08 | 704.08 | 704.08 | 704.08 | 704.08 |
| 6. | Reserves (Excluding Revaluation Reserves as shown in the Balance Sheet of Previous Year) | - | - | - | - | - | 385.65 |
| 7. | Earnings Per Equity Share (For continuing operations) | | | | | | |
| | a) Basic | 0.01 | (0.01) | 0.01 | 0.00 | 0.01 | 0.03 |
| | b) Diluted | 0.01 | (0.01) | 0.01 | 0.00 | 0.01 | 0.03 |

Place : Nagpur
Date : 14th November, 2025

For Diamant Infrastructure Limited
Sd/-
Mr. Naresh Satyanarayan Saboo
Managing Director
DIN No. 00297916

# स्वामी समर्थ पालखी परिक्रमेचे उद्या अक्कलकोट येथून प्रस्थान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने स्वामी समर्थ पालखी परिक्रमेचे रविवारी (१६ नोव्हेंबर) अक्कलकोट येथून सकाळी अकरा वाजता प्रस्थान होणार आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २८ वर्षांपासून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येते. रविवारी पालखी परिक्रमेचे सकाळी अकरा वाजता अक्कलकोट येथून प्रस्थान होणार असून, यंदाचे २९ वे वर्ष आहे. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे, देवस्थानाचे मुख्य पुरोहित मोहन पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी अण्णू महाराज पुजारी आणि धनंजय पुजारी यांच्या हस्ते श्रींच्या पादुकांचे पूजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रसह कर्नाटक, गोवा येथे आठ महिने परिक्रमा करून पालखी पुढील वर्षी १५ जुलै रोजी अक्कलकोटनगरीत विसावणार असल्याची माहिती पालखी परिक्रमेचे मुख्य संयोजक संतोष भोसले यांनी दिली. पालखी परिक्रमा पश्चिम महाराष्ट्र, कोकण, बृहन्मुंबई, उत्तर महाराष्ट्र, खान्देश, मराठवाडा, विदर्भ विभागांसह कर्नाटक व गोवा या लगतच्या राज्यांत जात असते. अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी-पादुकांचे दर्शन गावोगावी असलेल्या भाविकांना घेता यावे या उद्देशातून पालखी परिक्रमेचे आयोजन केले आहे. अक्कलकोट येथे श्री स्वामींच्या इच्छेने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) स्थापन झाले असून, येथे दैनंदिन दोन्ही वेळेस हजारोंच्या संख्येने स्वामीभक्त महाप्रसादाचा लाभ घेतात. अन्नछत्रतर्फे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक, आपदग्रस्तांना मदत, शहरातील अपंग-निराधार नागरिकांना समर्थ महाप्रसाद सेवा, तालुक्यातील कुस्तीगीरांना दरमहा पैलवानकीचा पौष्टिक खुराक दिला जातो. आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याबरोबरच शासनाच्या विविध उपक्रमांना न्यास वेळोवेळी सहकार्य करीत असते.

# अलंकापुरीत वैष्णवांची मांदियाळी

**पिंपरी :** श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी यात्रेनिमित्त राज्यभरातून लाखो वैष्णवांची मांदियाळी अलंकापुरीत दाखल झाली आहे. वैष्णवांच्या उपस्थितीने अलंकापुरी फुलली आहे. ह्यज्ञानोबा, तुकोबाह्लचा जयघोष आणि पारायणाने आळंदीतील वातावरण भक्तिमय झाले आहे. कार्तिकी वारीतील मुख्य एकादशी सोहळा आज (शनिवारी), तर माउलींचा ७५० वा संजीवन समाधीदिन सोहळा सोमवारी (१७ नोव्हेंबर) रोजी संपन्न होणार आहे. यानिमित्त वारकरी मोठ्या संख्येने आळंदीत दाखल झाले आहेत.

## CENTRAL CABLES LIMITED

CIN No. L31300MH1981PLC023772
Regd Office : 5, Temple Road, Civil Lines, Nagpur-440001,
Corporate Office: 1, Shakespeare Sarani, 6th Floor Room No. 6C, A. C. Market, Kolkata-700071
Phone No.:- +91- 712 - 2523054, 2546468, Fax :- +91 - 712- 2536149
Email : care.centralcables@gmail.com, Website : www.centralcables.in

**EXTRACT OF UNAUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED 30TH SEPTEMBER 2025**

Amount (Rs. in lacs)

| Sl. No. | Particulars | Quarter Year Ended 30.09.2025 | Corresponding 3 months ended in the previous year 30.09.2024 | Half Year Ended 30.09.2025 |
|---|---|---|---|---|
| | | Un-Audited | Un-Audited | Un-Audited |
| 1 | Total Income from Operations | 47.19 | 82.96 | 166.74 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and /or Extraordinary items) | -48.54 | -4.90 | -17.02 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period after Tax (after Exceptional and /or Extra-ordinary items#) | -48.54 | -4.90 | -17.02 |
| 4 | Other Comprehensive Income | - | -6.56 | 2.26 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax)] | -48.54 | -11.47 | -33.29 |
| 6 | Equity Share Capital | 162.50 | 162.50 | 162.50 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (For continuing and discontinued operations)** | | | |
| | (A) Basic : | (2.99) | (0.30) | (2.19) |
| | (B) Diluted : | (2.99) | (0.30) | (2.19) |

**Not Annualised
# The Company does not have Exceptional and Extra-ordinary items.

**Notes :** The above is an extract of the Unaudited Financial Results for quarter ended on 30th September, 2025, filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly and unaudited Financial Results is available on the website of Metropolitan Stock Exchange of India at (www.msei.in) and on the Company's website ( www.centralcables.in).

2. The above results were reviewed by the Audit Committee, approved by the Board at its respective meeting held on 14th November, 2025.

3. The Auditors have carried out Limited Review (LR) on the aforesaid financial results for the quarter and half year ended 30.09.2025 as required in terms of Regulation 33 of SEBI (LODR) Regulation, 2015 and the report was placed before the Board and the same was noted.

4. The Statutory Auditors have provided un-modified report on Unaudited Financial Results for the quarter ended 30.09.2025.

5. The Company does not have Exceptional and Extraordinary items.

Place: Kolkata
Date : 14.11.2025

On behalf of the Board of Directors
For Central Cables Limited

Sd/-
Swarna Mimani
Whole time Director
DIN: 01186819

DIFFUSION
Innovative superconditioning solutions

Half Year (H1) FY 26 Y-o-Y STANDALONE
PAT 58.90 % YOY ₹241.17 Mn.
Diluted EPS ₹6.44/share

Half Year (H1) FY 26 Y-o-Y CONSOLIDATED
PAT 42.55 % YOY ₹225.28 Mn.
Diluted EPS ₹5.95/share

Date: 14/11/2025
Place: Nagpur

By order of the Board
Diffusion Engineers Limited
Abhishek Mehta
Chief Financial Officer

The Results along with the Auditor's Limited Review Report, have been posted on the website of Stock Exchanges (www.bseindia.com and www.nseindia.com) and Company's website at (www.diffusionengineers.com) and can be accessed by scanning the QR Code.

Adfactors 633/25

## जाहीर लिलाव नोटिस

(सी.पी.सी. ऑर्डर २१ रूल ६६ प्रमाणे)
प्रोसेस क्र. ५४०४/२०२५ दि. ०५/११/२०२५
**कोर्ट विद्यमान ६ वे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, भंडारा**
आरबीट्रेशन दरखास्त क्र. १९७/२०२१ पेशी ता. २६/११/२०२५

**श्रीराम फायनान्स लि. आदेशधारी -विरुध्द -**
**सेवकराम सोनकुसरे व इतर**
**याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की,**

१) ज्याअर्थी दरखास्तदार यांनी रक्कम रु १३,६९,५९२/- मात्र + व्याज अशी मिळून एकूण इतकी रक्कम नि:ऋणी यांचेकडून वसूल होऊन मिळणेकामी प्रस्तुतची दरखांस्त विद्यमान कोर्टात दाखल केलेली आहे.

२) खालील परिशिष्टात नमुद केलेली नि:ऋणी क्र. १ श्री.सेवकराम हरीचंद्र सोनकुसरे यांचे मालकीची मिळकत ही विद्यमान कोर्टाचे आदेशाप्रमाणे जप्त झालेली असून सदर मालकीची सी. पी. सी. आर्डर २१ रुल ६६ प्रमाणे लिलावाद्वारे विक्री करणेबाबत निशाणी २४ वर मा. न्यायालयाने आदेश पारीत केलेले आहेत.

३) ज्याअर्थी सदरची मिळकत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार बोलीकरीता लिलावा कारणेकामी दि. ०५/१२/२०२५ रोजी पेशी तारीख निश्चित केलेली आहे. त्या अर्थी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार व नेमून दिलेल्या अटी व शर्तीनुसार लिलावाद्वारे विक्रीस काढण्यात येईल.

४) सदर विक्री कार्यवाई पुढे ढकलण्याकामी कोणताही आदेश झालेला नसल्यास मिळकतीची लिलावाद्वारे विक्रीची कार्यवाही प्रस्तुत नोटीसीत खाली नमुद केलेल्या मिळकतीचे ठिकाणी दि.०५/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता विद्यमान कोर्टाचे बेलिफ यांचेमार्फत केली जाईल. तथापी कोणत्याही क्षणी बोली मंजुर होण्यापुर्वी जर उपरोक्त जाब देणार यांनी दरखांस्तदार संस्थेची व्याजासह संपुर्ण रक्कम तसेच विक्रीचे खर्चाची रक्कम देउ केल्यास प्रस्तुतची विक्री कार्यवाही थांबविण्यात येईल.

५) विक्रीच्या वेळी तमाम जनतेपैकी कोणालाही व्यक्तीश: किंवा रीतसर प्रादीकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत बोली बोलण्याची मुभा राहील. तथापी प्रस्तुत दरखास्तीतील दरखास्तदार किंवा त्यांच्या वतीने बोललेली बोली स्वीकारली जाणार नाही. तसेच न्यायालयाचे पुर्व परवानगी शिवाय या दरखास्तदार यांना केलेली कोणतीही विक्री ग्राहय ठरनार नाही.

**विक्रीच्या आणखी काही अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-**

अ) मिळकतीची राखीव किंमत ही विद्यमान कोर्टाचे आदेशाप्रमाणे कोर्टातर्फे लिलावाचे कामकाज पाहणार बेलिफ निश्चित करतील.

ब) सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास मिळकतीचा खरेदीदार म्हणुन घोषित केला जाईल, मात्र तो बोलीदार बोली बोलण्यास कायदेशीर पात्र असला पाहिजे. तसेच सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली किंमत अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून आल्याने ती बोली नाकारणे इष्ठ ठरेल असे मा. न्यायालयाने किंवा विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यास वाटल्यास न्यायालय किंवा न्यायालयाचे तत्सम अधिकारी स्वविवेकानुसार ती बोली स्वीकरण्यास नकार देऊ शकेल. मिळकतीची राखीव किंमत ही विद्यमान कोर्टाच्या आदेशाप्रमाणे कोर्टातर्फे लिलावाचे कामकाज पाहणारा बेलीफ निश्चित करतील.

क) मिळकतीचे बोलीनंतर ज्याव्यक्तीस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. त्या व्यक्तीने तशी घोषणा झाल्यानंतर ताबडतोब ठरलेल्या खरेदी किंमतीच्या २५ टक्के एवढी विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून भरली पाहिजे. अशारितीने रक्कम भरण्यास कसूर झाल्यास ती मिळकत ताबडतोब लिलाव करुन विकली जाईल.

ड) मिळकतीची विक्री झाल्याचे जाहीर झाल्यापासून विक्रीचा दिवस वगळून पंधराव्यादिवशी मा. न्यायालयाने कामकाज बंद होण्यापूर्वी खरेदीदाराने खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम भरणे आवश्यक व बंधनकारक राहील किंवा पंधरावा दिवस हा रविवार किंवा सुटीचा दिवस असल्यास पंधराव्या दिवसानंतरच्या पहिल्या कामकाजाच्या दिवशी अशी रक्कम भरणे मिळकत खरेदीदारावर बंधनकारक राहील.

इ) खरेदी किंमतीची उर्वरित रक्कम नमुद केल्याप्रमाणे मुदतीत भरल्यास खरेदीदाराकडून कसूर झाल्यास विक्रीची नवीन अधिसूचना काढून प्रस्तुत मिळकतीची पुन्हा विक्री करण्यात येईल. अशा प्रसंगी खरेदीदाराने अदा केलेल्या अनामत रक्कमेमधून विक्रीचा खर्च भागविल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम मा. न्यायालयास उचित वाटल्यास संबंधित खरेदीदारास परत केली जाईल. परंतु कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे मिळकतीवर खरेदीदार म्हणून निर्माण झालेले सर्व हक्क व अधिकार संपुष्टात येतील.

तरी प्रस्तुतची मिळकत खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या खरेदीदाराने/खरेदीदारांनी दि. ०५/१२/२०२५ रोजी मिळकतीच्या ठिकाणी बोली बोलण्यासाठी हजर रहावे.

**मिळकतीचे परिशिष्ट व लिलावाचे ठिकाण :-** श्री. सेवकराम हरीचंद्र सोनकुसरे, रा. रविदास नगर, तुमसर, तह. तुमसर जि. भंडारा येथील यांच्या मालकीचे मिळकती खालील प्रमाणे आहेत.

१) क्षेत्रफळ ६२.०० चौ.मी. व त्यावरील पक्क्या घराचे २८.९० चौ. मी. चे बांधकाम, मालमत्ता नं. ०६०३०००७९, सर्वे नं. ८८२ शिट नं. २४, मौजा रविदास नगर, तुमसर, तह. तुमसर जि. भंडारा.

२) क्षेत्रफळ ३८.०० चौ.मी. मालमत्ता नं. ०६०३००००७८, सर्वे नं. ८८३ शिट नं. २४, मौजा रविदास नगर, तुमसर, तह. तुमसर जि. भंडारा.

३) क्षेत्रफळ ८१.०० चौ.मी. व त्यावरील पक्क्या घराचे २९.९० चौ. मी. चे बांधकाम, मालमत्ता नं. ०६०३००००८०, सर्वे नं. ८७८ शिट नं. २४, मौजा रविदास नगर, तुमसर, तह. तुमसर जि. मंडारा

**वरील तिन्ही मालमत्तेचे एकूण मुल्यांकन रु.१८, २३,०६२ इतके आहे.**

प्रस्तुत नोटीस आज तारीख ०५/११/२०२५ रोजी मा. न्यायालयाचे सही व शिक्यानिशी दिली असे.

**भंडारा**
**दि. ०५/११/२०२५**

**सही**
**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर - भंडारा**

## बैंक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra

भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

### अस्ति वसुली कक्ष नागपूर

"महाबँक भवन", सिताबर्डी, मुंजे चौक, सिताबर्डी, नागपूर – 440012
टेलिफोन : 0712-2545020/21/29 | ई-मेल: zmnagpur@mahabank.co.in; dzmnagpur@mahabank.co.in
प्रधान कार्यालय: लोकमंगल 1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ

### प्रत्यक्ष ताबा सुचना (नियम 8 (1) अचल मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी वित्तीय प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि प्रतिभूती अमलबजावणी (द्वितीय) अधिनियम 2002 च्या अंतर्गत **बँक ऑफ महाराष्ट्रचे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने आणि प्रतिभूती हिताधिकार (अमलबजावणी) नियमावली 2002 च्या नियम 3 सह वाचल्या जाणाऱ्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मागणी सुचना दिनांक खालील प्रमाणे नमुद केली असुन खालील उल्लेखित थकबाकी रक्कम ही सूचना प्राप्तीनंतर 60 दिवसांच्या आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने देण्यात आली होती. तरी कर्जदार/जमानतदार यांनी या रक्कमेची परतफेड न केल्यामुळे, कर्जदार / जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला सुचित करण्यात येते की खालील सही करणाऱ्यांनी उक्त नियमावली नियम 8 सह वाचल्या जाणाऱ्या आणि उक्त अधिनियमाच्या कलम 13 (4) च्या अंतर्गत त्यांना | प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन बँकस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** बँकेने घेतला आहे.

विशेषत्वेकरुन कर्जदार/ जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला एतद् द्वारा ताकीद देण्यात येते कि, त्यांनी या संपत्तीबाबत कोणताही व्यवहार करु नये आणि या संपतीचा कोणताही व्यवहार कर्जदाराकडून व्याजासह याने असलेल्या रकमेकरीता **बँक ऑफ महाराष्ट्राच्या** प्रभाराधीन राहील.

गहाण मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी सदर कायद्याच्या कलम 13 मधील उप-कलम 8 च्या तरतुदीनुसार उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात कर्जदाराचे लक्ष वेधत आहे.

| अनु. क्र. | कर्जदार / जमानतदार यांचे नाव | अचल संपत्तीचे वर्णन | मागणी सुचनेची दिनांक | थकबाकी रक्कम | ताब्याचा दिनांक व प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार - 1.गिरधारी दिनकरराव बागरे, 2. श्रीमती रोहिणी दिनकरराव बागरे** **पत्ता:** C/o. बापुलाई बाविस्तके प्लॉट नं. 752/2, कापसे चौक, गरोबा मैदान नागपूर-440009 | जमिनीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले निवासी द्विन डुप्लेक्स/ बिल्डींग नं. 35ए, समावेश प्लॉटचा क्षेत्रफळ एरीया 135 चौ.मी. (म्हणजे 1452 चौ.फुट) आणि बांधकाम/ बिल्टअप क्षेत्रफळ एरीया 102.285 चौ.मी. (म्हणजे 1101 चौ.फुट) असलेले स्थित संपूर्ण जमिनीचा एक भाग असलेले सर्व्हे/खसरा नं. 177/4, प.ह.नं. 53, असलेले क्षेत्रफळ एरीया 01.11 हेक्टर आर (म्हणजे 11100 चौ.मी.) असलेले मौजा चंकापूर कोराडी रोड, तहसिल सावनेर जिल्हा नागपूर खाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये विशेषत: वर्णन केलेल्या जमिनीच्या तुकड्यात 45.98% अविभाजित परिवर्तनशील प्रमाणित हिस्सा आणि एफएसआयशी संबंधित हितसंबंध ठेवण्याचे अधिकार आहेत जे विशेषत: येथे लिहिलेल्या अनुसूचीमध्ये सध्याच्या कराराचा भाग म्हणून खालीलप्रमाणे वर्णन केले आहेत. **संपत्तीची वर्णन आणि डुप्लेक्स नं. 35ए ची चतुर्सीमा खालीलप्रमाणे : पुर्वेस** - प्लॉट नं. 34, **पश्चिमेस** - प्लॉट नं. 36, **उत्तरेस** - रोड, **दक्षिणेस** - खसरा नं. 177. | 06/07/2019 | रु. 28,63,974/- अधिक लागु न झालेले व्याज @ एनपीए दि. 10/04/2019 पासून लागू दर आणि शुल्क/खर्च | 13/11/2025 (प्रत्यक्ष ताबा) |
| 2 | **कर्जदार - 1. श्री.मनोजकुमार सुखदेवराव नगरकर 2. श्रीमती शीला मनोजकुमार नगरकर** **पत्ता:** प्लॉट नं. 139, पंचशील नगर बुद्ध विहार जवळ, आंबेडकर मार्ग, कामठी रोड, नागपूर. | सर्व भाग आणि तुकडा असलेले डुप्लेक्स नं. 28, तळमजला आणि पहिला मजला असलेले बिल्डींग ड्रिमलाईन बिल्टकॉन प्रायवेल लिमिटेड मधील द ग्रिन टाऊन पार्क अर्पाटमेंट नावाने परिचीत क्षेत्रफळ 1573 चौ.फुट (बिल्टअप) आणि 1355 चौ.फुट (कारपेंट) स्थित गाव मौजा चनकापूर तहसिल सावनेर, जिल्हा नागपूर असलेले सीटीएस/सर्व्हे नं. 177/4. **संपत्तीची वर्णन आणि डुप्लेक्स नं. 28 ची चतुर्सीमा खालीलप्रमाणे : पुर्वेस** - प्लॉट नं. 29, **पश्चिमेस** - प्लॉट नं. 27, **उत्तरेस** - प्लॉट नं. 19, **दक्षिणेस** - रोड | 07/05/2021 | रु. 45,28,832/- अधिक लागु न झालेले व्याज @ एनपीए दि. 09/06/2020 पासून लागू दर आणि शुल्क/खर्च | 13/11/2025 (प्रत्यक्ष ताबा) |

**स्थान : नागपूर**
**दिनांक : 13/11/2025**

नोट : संबंधित जाहिरातीचे भाषांतर इंग्रजीवरुन करण्यात आले आहे, तरी अधिक अचूक माहितीसाठी इंग्रजी जाहिरात ग्राह्य धरण्यात यावे.

**प्राधिकृत अधिकारी आणि मुख्य प्रबंधक**
**बँक ऑफ महाराष्ट्र**